**चलचित्रपटांचा कल्पनाविष्कार**
**जोसेफ वर्शिंग आणि द बॉम्बे टॉकीज**

या प्रदर्शनातून एक वेगळेच जग आपल्याला उलगडते ज्यात संस्कृतींचा एक सुरेख संगम घडून आलेला दिसतो ज्याने बर्लिन आणि कलकत्ता (कोलकाता), म्युनिक आणि बॉम्बे (मुंबई) या शहरांना एकमेकांच्या जवळ आणले. हे प्रदर्शन जर्मन चलचित्रनिर्माता जोसेफ वर्शिंग यांच्या छायाचित्रण संग्रहावर आधारित आहे. वर्शिंग यांनी भारतच आपले निवासस्थान प्रस्थापित केले व हीच आपली कर्मभूमी बनविली. वर्शिंग यांच्या संग्रहात कलाकारांबरोबरच पडद्यामागच्या कलाकारांच्या छायाचित्रांचा तसेच, चित्रपट निर्मिती आणि प्रसिद्धी दरम्यान काढण्यात आलेल्या छायाचित्रांचा समावेश आहे. या छायाचित्रांमधून आपल्याला ब्रिटीश राजवटीच्या शेवटच्या काळातील भारतीय चित्रपट निर्मिती करणाऱ्या सर्जनशील कलाकारांच्या सौंदर्यदृष्टीचे दर्शन घडते.

शतकाच्या उत्तरार्धात स्वदेशी संस्कृती आणि आधुनिकतेचा संगम असलेली सौंदर्यात्मक शैली भारतीय कलाकारांनी अत्यंत प्रयत्नपूर्वक विकसित केली. युरोपीय शैक्षणिक विचार आणि वसाहतवादी परंपरेतील रूढीवादी प्रवृत्तीला कंटाळून भारतीय कलाकार स्थानिक कलात्मक वारसा आणि ब्रिटिश साम्राज्याबाहेरील आधुनिकतेचा स्पर्श असलेल्या कलांकडे वळले. विशेष म्हणजे, प्रदीर्घ काळापासून भारतीय संस्कृतीचा अभ्यास करणारे जर्मनी राष्ट्रसुद्धा या प्रयत्नात सहभागी झाले. १९२०च्या दशकात रविंद्रनाथ टागोर यांनी जर्मनीला भेट दिली. त्यांच्या या भेटीमुळे प्रभावित होऊन ऑस्ट्रियन कला-इतिहासकार स्टेला क्रॅम्रिश शांतीनिकेतनमध्ये कार्यरत झाल्या आणि कलकत्त्यामध्ये त्यांनी ऐतिहासिक बावहौस प्रदर्शन (१९२२) आयोजित केले.

भारत आणि जर्मनी या दोन देशांमधील सांस्कृतिक देवाणघेवाण चित्रपटविश्वात ठळकपणे दिसून येते. 'ओरिएन्टल' चित्रपट कंपनीच्या *स्युम्युरन* (१९२०), द *टायगर ऑफ एश्नापूर* (१९२१) आणि *दि इंडियन टूम्ब* (१९२१) यांसारख्या आशियायी चित्रपटांच्या यशाबरोबरच तांत्रिक प्रशिक्षणासाठी जर्मन स्टुडिओशी संपर्क साधणाऱ्या भारतीय चित्रपट निर्मात्यांची महत्त्वाकांक्षा देखील पूर्ण झाली. राजा रविवर्मा यांनी कॅलेंडर आर्टचे मोठ्या प्रमाणात उत्पादन करून छपाईची जर्मन क्रोमोलिथोग्राफिक तंत्रे आणि युरोपीय दृष्टिकोनातून साकारलेल्या देहरचनेची विशिष्ट शैली लोकप्रिय केली होती.

१९२०च्या दशकात दादासाहेब फाळके, व्ही. शांताराम आणि हिमांशू राय यांसारख्या निस्सीम राष्ट्रभक्त आणि निडर चित्रपट निर्मात्यांनी जर्मन ओबेरामेरगाऊ येथील येशू ख्रिस्ताच्या जीवनावर आधारित नाटके, बंगाल चित्रशैलीतील व्यक्तिचित्रे, जर्मनी येथील *हायमतफिल्म* म्हणजेच मातृभूमीवर आधारित ग्रामीण जीवनावरील कथा, आर्ट डेको आणि औद्योगिक संमिश्र शैली रचना आणि हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत यांच्यापासून प्रेरणा घेऊन जाणीवपूर्वक चित्रपटनिर्मिती केली.

दुसऱ्या महायुद्धानंतर एक वेगळ्याप्रकारची देवाणघेवाण सुरु झाली. वॉल्टर काउफमन आणि विली हास यांसारखे निर्वासित ज्यू मुंबईत आले आणि त्यांनी इथल्या स्थानिक चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. १९३४ मध्ये सुरु झालेल्या बॉम्बे टॉकीज स्टुडिओने हिमांशू राय, फ्रॅन्झ ऑस्टन, जोसेफ वर्शिंग, निरंजन पाल आणि देविका रानी यांच्या नेतृत्त्वाखाली चित्रपट निर्मितीच्या माध्यमातून सांस्कृतिक परिवर्तनाला चालना दिली.

बॉम्बे टॉकीजने भारतीय चित्रपटांना व्यावसायिक स्वरूप देण्यात मोठी भूमिका बजावत तत्कालीन सामाजिक सुधारणांच्या मुद्द्यांवर आधारित अनेक सुप्रसिद्ध संगीतमय चित्रपटांची निर्मिती केली. या चित्रपटांनी पूर्व आणि पश्चिमेकडील संस्कृतींचा मुक्तहस्ते वापर करून एक नवीन सौंदर्यशैली निर्माण झाली. या स्वतंत्र शैलीला "स्वदेशी आधुनिकतावाद" असे म्हणता येईल. ही शैली आपल्याला भारतीय आणि विदेशी; तसेच पारंपारिक आणि प्रायोगिक अशा चालीरीतींवर गांभीर्याने विचार करण्यास प्रवृत्त करते.

जोसेफ वर्शिंग यांच्या कलात्मक दृष्टीतून बॉम्बे चित्रपटसृष्टीला जर्मन अभिव्यक्तीवादातील वैचारिक खोलीचा आणि सांस्कृतिक मूल्यांचा स्पर्श झाला. तसेच जोसेफ वर्शिंग यांचा छायाचित्रण संग्रह पाहताना "सिनेमॅटिक" म्हणजेच 'चित्रपटाविषयीचा' या शब्दाचा खरा अर्थ आपल्याला समजतो. "सिनेमॅटिक" ही संज्ञा वास्तवाच्या पलीकडे जाऊन आकर्षकपणे मांडलेल्या दृश्यांचे वर्णन करण्यासाठी वापरली जाते. या दृश्यांमध्ये आपल्याला व्यक्ती, त्यांच्या सभोवतालच्या वस्तू आणि वातावरणाचा एकमेकांशी असलेला परस्परसंबंध दिसतो. या कलात्मक दृष्टीमुळे चित्रपट निर्मितीच्या क्लिष्ट प्रक्रियेमधील सौंदर्य आणि रंगमंचीय नाटकाचा अविष्कार दिसून येतो.

या प्रदर्शनाच्या माध्यमातून आम्ही आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करणारे आणि भारतीय चित्रपटसृष्टीचे प्रणेते जोसेफ वर्शिंग यांना विनम्र आदरांजली अर्पण करीत आहोत.